## नियमित दिवाणी दावा क्र. ८५/२०१६ मधील नि.क्र. २२ वरील आदेश

**श्री. विठ्ठल रामा तेजम वि. श्री. धुळू जानू कोकरे, वगैरे.**

प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई हुकूमाचा आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १, नियम १०(२) अन्वये, नि.क्र. २२ वर दाखल केलेल्या या अर्जाद्वारे वादी हे अर्ज परिच्छेद क्र. ६ मध्ये नमुद एकूण ६ व्यक्तींना प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ६ ते ११ म्हणून सामिल करण्याची विनंती करत आहे. अर्जात वादी कथन करतो की, सदर दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी वाद मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखताने हस्तांतरण केले आहे व सदरचे व्यवहार हे यातील वादीवर मुळीच बंधनकारक नाहीत. या हस्तांतरणाच्या अनुषंगाने उपरोक्त प्रतिवादींनी ज्या व्यक्तींच्या लाभात वाद मिळकतीचे हस्तांतरण केले आहे त्या व्यक्तींना प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणून सामिल करणे आवश्यक आहे. यास्तव, वादीने उपरोक्तप्रमाणे अनुतोष मागितला आहे. अर्जासोबत वादीचे शपथपत्र जोडले आहे.

२. अर्जाच्या मलपृष्ठावर प्रतिवादींचा खुलासा सादर केला आहे. प्रतिवादी कथन करतात की, वादीस दुरुस्त अनुतोष मागण्याचा अधिकार नाही व वादीचा वाद मिळकतीशी काहीएक संबंध नाही. दाव्याचे स्वरुप पाहता, उपरोक्त व्यक्तींना प्रतिवादी म्हणून दाव्यात सामिल करणे मुळीच आवश्यक नाही. त्यामुळे, प्रतिवादींनी वादीचा प्रस्तुत अर्ज निरसीत करण्याची विनंती केली आहे.

३. वादीतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. आर.पी. बांदिवडेकर यांचा व प्रतिवादींतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. एस.एस. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १, नियम १०(२) अन्वये अन्वये दाखल केला असल्याचे म्हटले आहे. तथापि, वादीचे अर्जातील कथन व अनुतोषाचे स्वरुप पाहता, वादीचा प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम २२, नियम १० अन्वये चौकशीस घेता येईल. अर्जास चुकीचे शिर्षक दिले म्हणून अर्जाच्या सुनावणीस तसेच अनुतोषास कोणतीही तांत्रिक बाधा निर्माण होत नाही. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.

१,२ व ५ यांनी वाद मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखताने अर्ज परिच्छेद क्र. ६ मध्ये नमुद व्यक्तींच्या लाभात हस्तांतरण केल्याचे वादीचे कथन असून सदर कथनाच्या पुष्ठयर्थ वादीने त्याचे शपथपत्र दाखल केला असल्याने ते नाकारण्याचा मुळीच प्रश्न उद्भवत नाही. वादी हा प्रभुत्ववादी असल्याने दाव्यात प्रतिवादी व अनुतोष निवडीचे स्वातंत्र्य वादीस आहे. सामिल करण्यात येणा–या प्रस्तावित प्रतिवादींच्या वतीने कथन करण्याचा अथवा अर्जात नमुद वादीचे कथन नाकारण्याचा या प्रकरणातील प्रतिवादींना मुळातच अधिकार असू शकत नाही. या सर्व कारणांस्तव, वादीचा प्रस्तुत अर्ज मान्य होण्यास पात्र ठरतो. परिणामी, निम्न आदेश.

**आ दे श**

नि.क्र. २२ वरील अर्ज मागणीप्रमाणे विनाखर्च मान्य करण्यात येत आहे.

अर्ज परिच्छेद क्र. ६ मध्ये नमुद व्यक्तींना प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. ६ ते ११ म्हणून सामिल करण्यास वादीस परवानगी देण्यात येत आहे.

वादीने या आदेश्याचा दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्तप्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह व हुकूमनाम्यासाठीच्या प्रतीसह अभिलेखावर दाखल करावे.

Amrit Chandrakant Birajdar

Digitally signed by Amrit Chandrakant Birajdar
Date: 2019.10.16 16:03:22 +0530

दि.१५/१०/२०१९ (**अमृत चं. बिराजदार**)

चंदगड दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.G. Kamble, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 15/10/2019 |
| order signed by the P. O. on | 15/10/2019 |
| order uploaded on | 16/10/2019 |